# जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, मुंबई शहर

ओल्ड कस्टम हाऊस, शहीद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१
Fax २२६६१२३९, Tel. २२६६५२३३, Email : collector_mumbaicity@maharashtra.gov.in
(भूमापन व भूमि अभिलेख शाखा)

क्रमांक : सीएसएलआर/एसॲण्डएलआर-१ व २/टे-१/कांदळवन तक्रारी/२०१९
दिनांक : 22 /०४/२०१९ जा. क्र. 632

प्रति,

मा.विभागीय आयुक्त,
कोकण विभाग, कोकण भवन,
सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई-४०० ६१४.

**विषय** :- कांदळवन संरक्षण व संवर्धन
कांदळवनाचे ऱ्हासाबाबतची संयुक्त पहाणी करणेबाबत.
श्री. स्टॅलिन डी व लुक मेंडीस यांचा दि. 29/11/2018 रोजीच्या ई-मेलव्दारा प्राप्त तक्रारीनुसार.
Mangroves under threat at Bandra East below Mahim-sion link way.

**संदर्भ** :- 1) निवासी उपजिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांचेकडील पत्र क्र. सी/कार्या-2/आय/टे-8/कावि. - को.स.कां.त./18 दि. 14/01/2019 रोजीचे पत्र. (E-mail व्दारे प्राप्त दि.27/02/2019)
2) सदस्य सचिव, कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती तथा उपवनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई यांचेकडील पत्र क्र. कक्ष – 1/ल.ले/165/सन2018-19 फोर्ट, मुंबई 400 001. दि.10/12/2018.

मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी रिट याचिका क्रमांक ३२४६/२००४ मध्ये दिनांक ०६/१०/२००५ रोजी दिलेला निर्णय व त्यातील रूपांतरीत जनहित यांचिका क्रमांक ८७/२००६ मध्ये दिनांक २७/०१/२०१० रोजी दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने श्री. स्टॅलिन डी व श्री. लुक मेंडीस, यांनी दि.२९/११/२०१८ रोजी कांदळवनाच्या/ पाणथळाच्या ऱ्हासाबाबत दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने सखोल चौकशी करून, केलेल्या कार्यवाहीचा सविस्तर अहवाल पुढीलप्रमाणे सादर करीत आहोत.

## कांदळवन तक्रारीचा पुर्तता अहवालाचा नमुना

| अ.क्र. | तक्रारीचा तपशील | कार्यवाहीचा तपशील |
|---|---|---|
| १. | तक्रारदाराचे नांव व दिनांक | श्री. स्टॅलिन डी व श्री. लुक मेंडीस,, दि.२९/११/२०१८ |
| २. | तक्रारीचा विषय | Mangroves under threat at Bandra East below Mahim-sion link way. |
| ३. | तक्रारीशी संबंधित जागेचा तपशील उदा.स.नं., गावाचे नांव, तालुका. | माहिम महसुल विभाग. |
| ४. | चौकशी करणाऱ्या अधिकाऱ्याचे नांव व पदनाम | तक्रारीच्या अनुषंगाने दि.२०/०३/२०१९ रोजी या कार्यालयातील श्री.बी. व्ही तोरस्कर, परिरक्षण भूमापक, कांदळवन संधारण घटक मध्य मुंबई यांचेकडील श्री. र. र. मन्सूरी (वनपाल दादर / |

Received 22/4/2019

| | | |
|---|---|---|
| | | कुलाबा) व डी. एल. झुगरे (वनरक्षक दादर) |
| ५. | चौकशीमध्ये आढळून आलेली वस्तुस्थिती | सदर जागा ही माहिम धारावी पुल (Bridge) लगत असून, त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात डॅब्रीज टाकलेले आढळून आले. डॅब्रीज कोणी टाकले याबाबत स्थानिक रहीवाश्यांकडे चौकशी केली असता, डॅब्रीज हे रात्री उशिरा टाकण्यात येते. असे सांगण्यात आले. सद्यस्थितीत कांदळवनाचा ऱ्हास झालेला दिसून येत नाही.<br>परंतु सदर ठिकाणी मोठ्या प्रमाणात डॅब्रीज टाकले असल्याने ते पुढे पुढे सरकत तिवरांची झाडे जिथे आहेत. तिथपर्यंत पसरलेले आहे. भविष्यात डॅब्रीजचे प्रमाण वाढल्यास डॅब्रीज मुळे झाडांना मिळणाऱ्या पाण्याचा पुरवठा खंडीत होऊन, झाडे नष्ट होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी प्रथम त्याठिकाणचे डॅब्रीज हटविणे नितांत गरजेचे आहे. जेणे करुन झाडांना होणारा पाणी पुरवठा सुरळीत राहील. असे इकडील मत आहे.<br>इकडील अभिलेख पहाता, सदर जागा हि माहिम विभागातील असून, सदर जागा खाडीची आहे. त्याला भूकर क्रमांक देण्यात आलेला नाही. |
| ६. | कांदळवनाचा ऱ्हास झाला आहे किंवा नाही. | नाही. |
| ७. | कांदळवनाचा ऱ्हास झाला असल्यास दाखल केलेला गुन्हा क्रमांक, दिनांक व संबंधित पोलिस स्थानकाचे नांव | --- |
| ८. | कांदळवनाचा ऱ्हास झाला असल्यास, ज्यांच्याविरूद्ध गुन्हा दाखल केला आहे त्या व्यक्तिंची नांवे व पत्ता | --- |
| ९. | कोणत्या कायद्याअंतर्गत/कलमाअंर्गत गुन्हा दाखल केला त्याचे वर्णन | --- |

सदर तक्रारीच्या अनुषंगाने वरीलप्रमाणे कार्यवाही करणेत आली असून, यासोबत संयुक्त स्थळपाहणी केली असून, स्थळपाहणी अहवाल, गूगल नकाशा व पंचनामा पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर केलेला आहे.

(शिवाजी जोंधळे)
जिल्हाधिकारी, मुंबई शहर

प्रत :-

1) सदस्य सचिव, कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती तथा उपवनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांचे कार्यालय.302, वेक फिल्ड हाऊस, 3रा मजला, ब्रिटानिया रेस्टोरंट जवळ, बॅलार्डइस्टेट, फोर्ट, मुंबई-400 001.

61/2019

# स्थळ पहाणी अहवाल

भूमापन शाखा
दि. /03/2019

सविनय सादर,

**विषय :-** कांदळवन सरंक्षण व संवर्धन.
कांदळवनाचे ऱ्हासाबाबतची संयुक्त पहाणी करणेबाबत श्री. ल्यूक मेन्डेस यांचा दि.29/11/2018 रोजीच्या ई-मेलद्वारे प्राप्त तक्रारीनुसार.

**संदर्भ :-** या कार्यालयाकडील ज्ञाप क्र. सीएसएलआर/एसॲन्डएलआर /1 व 2 /टे-1/ कांदळवन ऱ्हास / संयुक्त स्थळपहाणी /2019 दि. 06/03/2019 चे पत्र.

उपरोक्त विषयांकित कामी दि. 22/03/2019 रोजी वन संरक्षक दादर, वन संरक्षक कुलाबा व वनपाल श्री. र. स. मन्सूरी यांचे समवेत स्थळ पहाणीच्या ठिकाणी उपस्थित राहीलो परंतु तक्रार अर्जदार श्री. स्टॅलीन डी. व श्री. ल्यूक मेन्डेस, किंवा त्यांचे प्रतिनिधी उपस्थित राहू शकले नाहींत.

तक्रार अर्जदार श्री. स्टॅलीन डी. यांचेशी भ्रमनध्वनी क्रमांक 9820232302 या व्दारे संपर्क साधला असता, त्यांचेकडून असे सांगण्यात आले की, न्यायालयीन कामी न्यायालयात उपस्थित असल्याने सदर ठिकाणी उपस्थित राहू शकत नाही. असे त्यांनी सांगितले. त्यांनी सांगितले की, दि. 20/03/2019 रोजी ज्या जागेची स्थळपहणी केली त्याच जागेविषयी आमची तक्रार आहे.

सदर जागा ही माहिम धारावी पुल (Bridge) लगत असून, त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात डॅब्रीज टाकलेले आढळून आले. डॅब्रीज कोणी टाकले याबाबत स्थानिक रहीवाश्यांकडे चौकशी केली असता, डॅब्रीज हे रात्री उशिरा टाकण्यात येते. असे सांगण्यात आले. सद्यस्थितीत कांदळवनाचा ऱ्हास झालेला दिसून येत नाही.

परंतु सदर ठिकाणी मोठ्या प्रमाणात डॅब्रीज टाकले असल्याने ते पुढे पुढे सरकत तिवरांची झाडे जिथे आहेत. तिथपर्यंत पसरलेले आहे. भविष्यात डॅब्रीजचे प्रमाण वाढल्यास डॅब्रीज मुळे झाडांना मिळणाऱ्या पाण्याचा पुरवठा खंडीत होऊन, झाडे नष्ट होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी प्रथम त्याठिकाणचे डॅब्रीज हटविणे नितांत गरजेचे आहे. जेणे करुन झाडांना होणारा पाणी पुरवठा सुरळीत राहील. असे इकडील मत आहे.

इकडील अभिलेख पहाता, सदर जागा हि माहिम विभागातील असून, सदर जागा खाडीची आहे. त्याला भूकर क्रमांक देण्यात आलेला नाही.

वरीलप्रमाणे वस्तूस्थिती माननीयांच्या अवलोकनार्थ सादर.

सोबत :- स्थळदर्शक छायाचित्रे, गुगल नकाशा व जागेवरील पंचनामा सादर असे.

जिल्हाधिकारी कार्यालय
महसुल शाखा / नगर भुमापन शाखा
आवक क्रमांक :- 2577
दिनांक 11/4/2019
अधिक्षक

(signature) 30/3/2019
बी. व्ही. तोरस्कर
(परिरक्षण भूमापक)

दिनांक - 22/03/2019

## पंचनामा

मा. जिल्हाधिकारी मुंबई (शहर) यांचे कार्यालयातील परि. भूमापक यांचे समोर आम्ही खाली सह्या करणारे पंच लोक माहीम-सायन लिंक रोड आज दिनांक 22/03/2019 रोजी विचारले वरून सत्यप्रतिज्ञेवर लिहून देतो की,

मा. अपर प्रधान मुख्य वनरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांचे कार्यालयाकडील पत्र श्री. स्टॅलीन डी व ल्यूक मेंडीस यांचे तक्रारी अर्जाचे अनुषंगाने स्थळ पाहणी साठी परि. भूमापक व वनअधिकारी प्रत्यक्ष जागेवर आले परंतु तक्रारदार किंवा त्यांचे प्रतिनिधी 1.30 पर्यंत जागेवर हजर राहिले नाहीत. त्यांना त्यांचे भ्रमण ध्वनी क्रं 9820232302 वरून वारंवार फोन करून संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता सुरुवातीला कॉल कापून नंतर फोन करतो असे स्टॅलीन डी यांनी सांगितले तदनंतर त्यांनी 1.35 मिनीटांनी फोन करून स्टॅलीन डी यांनी भ्रमणध्वनी द्वारे दिनांक 20/3/2019 रोजी श्री ल्युक मेंडीस यांनी स्थळ पहाणी वेळी दाखविलेली जागा, त्याच जागेबद्दल माहीती नक्षार आहे असे सांगितले, परि- भूमापक व वनरक्षक व वनपाल यांचे समवेत स्थळ पहाणी केली. सदर ठिकाणी माहीम सायन लिंकच्या डाव्या बाजूला मोठ्या प्रमाणात डेब्रीज टाकलेले दिसून आले, सदर डेब्रीज हे कांदळवनांतील तिवरांच्या झाडापर्यंत पोहचलेले आहे. त्यामुळे झाडांना पाणीपुरवठा होत नाही भविष्यात झाडे नष्ट होण्याचीही शक्यता आहे. म्हणून लिहून दिला पंचनामा

(स्वाक्षरी)
22/3/2019 प.भू.
(बी. बी. तोरस्कर)
परि. भूमापक

(स्वाक्षरी)
22/03/2019
र. र. मन्सुरी
वनपाल दादर / कुलाबा

(स्वाक्षरी)
व. र. दादर
कांदळवन कक्ष मुंबई

ner







